स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/**१३७**/२०२२

दिनांक : २२.०९.२०२२

प्रति,
**मा.प्राचार्य/विभागप्रमुख,**
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय : अनुभूती समाजभान जागृती यात्रेत सहभागी होणेबाबत...**
**संदर्भ : अध्यक्ष, ग्रामायाण प्रतिष्ठान नागपूर यांचे पत्र क्रं.निरंक दिनांक १४.०९.२०२२**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ग्रामायण प्रतिष्ठाण, नागपूर यांचे प्राप्त पत्रानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाब अमरावती विद्यापीठ, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, व Students for Development, ABVP यांच्या संयुक्त सहकार्याने अनुभूती समाजभान जागृती यात्रेचे आयोजन दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत संपन्न होणार आहे.

सदर यात्रेत सहभागी होण्याकरीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृपया सूचित करावे. तसेच आपल्या सुलभ माहितीकरीता सहपत्रानुसार परिपत्रक जोडण्यात येत आहे. सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्याअनुषंगाने आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र : अध्यक्ष, ग्रामायाण प्रतिष्ठान नागपूर यांचे पत्र क्रं.निरंक दिनांक १४.०९.२०२२**

प्रतिलिपी :
०१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती



# अनुभूती




## ग्रामायण समाजभान जागृती यात्रा!

## उद्याच्या परिवर्तनक्षम युवा नेतृत्वासाठी

☯ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ☯ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ☯ महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा ☯ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली ☯ Students for Development, ABVP यांच्या संयुक्त सहकार्याने

**✻ स्वतःला स्वतःची ओळख पटविण्यासाठी ✻ वेगळी दुनिया एक्स्प्लोअर करण्यासाठी ✻ हटके माणसांना समजून घेण्यासाठी**














**आपआपल्या क्षेत्रात परिवर्तन घडविण्यात यशस्वी ठरलेल्या विदर्भातील ७५ सेवाभावी, सामाजिक, औद्योगिक, कृषी व संशोधक नेतृत्वाला प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची अभूतपूर्व संधी!**

प्रति, ____________________

सस्नेह नमस्कार,



### ❒ कोणासाठी? तरूणाईसाठी

तरुण मित्रांनो, ही आहे संधी बदल घडविणाऱ्या हातांना भेटण्याची. विदर्भातील सेवाभावी, सामाजिक, औद्योगिक, कृषी व संशोधक नेतृत्वाला प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांचे काम समजून घेण्याची आणि स्वतःलाही अंतर्बाह्य बदलण्याची!

तारुण्य म्हणजे मस्ती, तारुण्य म्हणजे मौजमजा, तारुण्य म्हणजे जवळच्या मित्रांसह मनसोक्त घालविलेला वेळ. हे तर खरेच आहे. आणि हे तर सगळेच करतात. पण, तारुण्याला आहे दुसरी बाजूदेखील. तारुण्य म्हणजे आऊट ऑफ दि बॉक्स थिंकिंग, तारुण्य म्हणजे जगाचा घेतलेला अनुभव, तारुण्य म्हणजे नवे काहीतरी जवळून बघण्याची, नवनव्या गोष्टी शिकण्याची संधी!

मित्रांनो, ग्रामायण संस्थेची ही अनुभूती समाजभान जागृती यात्रा म्हणजे असे वेगळे जग बघण्याची, कर्तृत्ववान, हटके काम करणाऱ्या माणसांना समजून घेण्याची संधी आहे. जीवनाला दिशा आणि ध्येय देणाऱ्या या यात्रेत सहभागी व्हा. रोजच जे जगतो, त्यापेक्षा हटके जगून बघा. स्वतःला एक्स्प्लोअर करा.

### ❒ युवा नेतृत्वासाठी संधी



समाजात अनेक व्यक्ती, संस्था आपआपल्या क्षेत्रात समाज परिवर्तनाच्या दृष्टीने कार्य करीत असतात. त्यांचे हे कार्य समाजाला सकारात्मक रीतीने प्रगतीपथावर ठेवण्यास सहाय्यभूत ठरत असते. या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन, तेथील नेतृत्वाशी संवाद साधून अनुभवणे ही मौल्यवान संधी आहे. ही संधी अगदी तरुण वयात मिळत असेल तर ती जीवनाला दिशा देणारी, ध्येय देणारी, आपल्या विचारात आमूलाग्र बदल घडविणारी ठरू शकते.

### ❒ यात्रेचे स्वरूप स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५ मान्यवरांच्या भेटी

✻ आपण अभ्यासणार आहोत ✻ विदर्भातील सामाजिक प्रकल्प ✻ उद्यम क्षेत्रातील रोल मॉडेल ✻ वेगळ्या वाटा यशस्वी रीत्या चोखळणारे शेतकरी ✻ भन्नाट कल्पकता असणारे पेटंट मिळविणारे सृजनशील संशोधक ✻ एक आयुष्य, एक ध्येय ठरवून जगणारे सामाजिक नेतृत्व



* युवावस्थेत सामाजिक कार्याला झोकून देऊन नवी वाट शोधणाऱ्या ध्येयवेड्यांना प्रत्यक्ष भेटून चर्चेची संधी
  * तुमचे सह-यात्री आणि पूर्ण अनोळखी लोकांशी संबंध निर्माण होतील. पुढे ते तुमचे आयुष्यातील सर्वात जवळचे मित्र बनतील.
  * आपल्या सामाजिक उपक्रमांद्वारे भारताची उभारणी करणाऱ्या रोल मॉडेल्सला तुम्ही भेटाल, ज्यांनी हजारो लोकांच्या आयुष्यात बदल घडवला. तुम्हाला तुमच्या जीवनाचे ध्येय ठरवण्यास ते सहाय्यक होतील.
  * भेट दिलेल्या प्रकल्पाची कार्यपद्धती, समाजासाठीचे योगदान, यावर यात्रेतील युवकाकडून काही योगदान अपेक्षित राहील.
  * विविध Projects, Innovative Supporting Activities च्या Intellectual Task द्वारे महत्त्वाच्या समस्यांबद्दल उमेदवारांची समज, त्या सोडवण्याची वचनबद्धता आणि दृष्टिकोन यांचा यात्रे दरम्यान विचार होईल.
  * मार्गातील ज्या Projects ला प्रत्यक्ष भेट देणे शक्य होणार नाही, त्या मान्यवरांचे अनुभव, चर्चा मुक्कामाच्या ठिकाणी घेण्यात येतील.

## ❐ निवड निकष



* संपूर्ण विदर्भातील निवडक प्रतिभाशाली नेतृत्वगुण असणारे व सामाजिक विचार करणारे ४५ सर्वोत्तम युवक युवतींना संपूर्ण निवड प्रक्रिये नंतर प्रवेश संधी
* **कोणती विद्याशाखा/कोणतेही कॉलेज**
* **विदर्भात राहणारे किंवा शिकणारे युवक/युवती**
* **वयोगट २० ते ३० वर्षे**
* **सहभागी युवक संख्या – ४५**
* विद्यार्थ्यांसाठी/नोकरी करणारे/व्यवसायीक/उद्योजक/शेतकरी/प्रोफ्रेशनल युवा अशा सर्वांसाठी

## ❐ Mentor



या यात्रेमध्ये चार ते पाच जण मेंटार म्हणून राहू शकतील. यांचे वय ३५ ते ५० च्या दरम्यान असू शकेल आणि ज्यांना विविध क्षेत्रात अशा कामांचा, यात्रांचा मार्गदर्शनाचा अनुभव आहे आणि ज्यांच्यात काही विशेष कौशल्य आणि गुणवत्ता आहे ,त्यांची यासाठी निवड करण्यात येईल. बाकी सहभागींना लागू असणाऱ्या सर्व अटी व बाबी यांना पण लागू राहतील. फॉर्म भरताना आपण मेंटार म्हणून सहभागी होऊ इच्छितो, असा उल्लेख करावा.

## ❐ उद्दिष्टे



- सामाजिक उपक्रमांद्वारे युवकांच्या मनात समाजसेवेचे बीजारोपण.
- प्रकल्पाचा अभ्यास करून सपोर्ट ग्रुप तयार व्हावा.
- समाजाला भेडसावणाऱ्या समस्या ओळखून त्या सोडविण्याचा दृष्टिकोन मिळावा तसेच त्या सोडविण्याप्रति स्वतः ची जबाबदारी स्वीकारणे.
- सृजनशील सकारात्मक नेतृत्वाची ओळख व्हावी.
- विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा प्राप्त व्हावी.
- त्यांच्या नेतृत्वगुणाचा व सामूहिक वृत्तीचा विकास व्हावा.

☯ सामाजिक उपक्रमाद्वारे भारताची निर्मिती हा समाजभान संवेदना जागृती यात्रेचा उद्देश. तरुणांना सामाजिक उपक्रमात घेऊन विकासाचे नेतृत्व, डेळळश्र एपींीशशिपशीी, उद्योजक, सामाजिक कार्य करण्यासाठी प्रेरणा देणे हे उद्दिष्ट आहे, अशा प्रकारे समाज–नेतृत्व–विकासाची चळवळ सुरू व्हावी.




## ❑ यात्रेचा कालावधी व शुल्क




- ☯ **ही १२ दिवसांची बस यात्रा आहे.**
- ☯ **साधारणत: २००० कि.मी. अंतर**
- ☯ **३० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२२**
- ☯ **सहयोग शुल्क– ७५००/– रू. प्रत्येकी**

☯ यात्रेचा खर्च भरपूर आहे परंतु विद्यार्थ्यांवर किमान भार पडावा या हेतूने यात्रेचे सहभाग शुल्क केवळ ७५००/– रू. ठेवले आहे. हे शुल्क निवड झाल्यानंतरच भरावयाचे आहे. त्याआधी कोणीही पैसे जमा करू नये. सहभागी होण्यासाठी सोबतच्या गुगल फॉर्म लींकवर जाऊन पूर्ण फॉर्म भरावा.

## ❑ नियोजित प्रवास क्षेत्र, प्रकल्प व नेतृत्व भेटी

**विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशीम, अकोला, बुलढाणा व अमरावती जिल्हा**

## ❑ अनुभूती यात्रा प्रवास रूपरेखा

**यात्रा प्रारंभ दिवस – १ नागपूर**
बुटीबोरी, मिहान येथे उद्योजकांशी भेट (Incubation Centre Nagpur University, VNIT, दीक्षाभूमी, रा.स्व.संघ, रेशिमबाग, हल्दीराम – दीनशा प्रमुखांची तसेच कुलगुरू, प्रगल्भ राजकीय नेतृत्व भेटी इत्यादी.

**दिवस – २ वर्धा**
* सेवाग्राम * पवनार * मध संकलन केंद्र * गोरस निर्मित मगन संग्रहालय * ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र * हिंदी विश्वविद्यालय कुलपति भेट इत्यादी

**दिवस – ३ चंदपूर**
* आनंदवन, वरोरा डॉ. विकास आमटे व कार्यकार्त संवाद * पर्यावरण बंडू धोतरे * आश्रय डॉ. हेडगेवार समिती * मधुकर अभ्यासिका * वनवासी कल्याण आश्रम * भाग्यश्री पतसंस्था इत्यादी

**दिवस – ४ हमेलकसा (अहेरी)**
* अनिकेत व दिगंत डॉ. प्रकाश आमटे संवाद * डॉ. कन्ना मडावी भेट * अहेरी * वनवासी कार्य * रोल संस्था इत्यादी

**दिवस – ५ गडचिरोली (मूल, वरोरा)**
* देवाजी तोफा, डॉ. सतीश गोगुलवार यांच्याशी संवाद * गोंडवाना विद्यापीठ कुलगुरू भेट * * वनउपज केंद * मूल तांदूळ प्लान्ट * * एकल विद्यालय * चार्मोशी इत्यादी

**दिवस – ६ यवतमाळ (वणी, जळका, पांढरकवडा, घाटंजी, दारव्हा)**
* ग्रामविकास प्रकल्प, जळका * ऑक्सीजन पार्क * निळोणा वृद्धाश्रम, * दीनदयाल सेवा प्रतिष्टान * नेर इत्यादी

**दिवस – ७ अकोला**
* कारंजा * अकोला * पी के व्ही. विद्यापीठ * आदर्श गोशाळा * उद्योजक भेट इत्यादी

**दिवस – ८ बुलढाणा**
* शेगाव (श्री गजानन महाराज संस्थान)* चिळली * जिजामाता जन्मगाव सिंदखेडराजा * बंडू पालवे अनाथ कार्य * हिवरा विवेकानंद आश्रम * खामगाव * लोणार सरोवर

**दिवस – ९ आकोट**
* श्री जितेंद्रनाथ महाराज अंजनगाव सूर्जी * परतवाडा शंकरबाबा पापळकर मतिमंदासाठी काम * आकोट जनजाती जागृती काम इत्यादी

**दिवस – १० मेळघाट**
* संपूर्ण बांबू केंद्र लवादा निरूपम देशपांडे * पद्मश्री सौ. स्मिता व श्री रवींद्र कोल्हे * महान डॉ. कविता व डॉ. आशिष सातव यांचे प्रकल्प इत्यादी.

**दिवस – ११ अमरावती**
* जाधव इंडस्ट्रीज * डॉ. व्हि. टी. इंगाले, * मा. कुलगुरूची भेट * पंचवटी * संत गाडगेबाबा कार्यपरिचय * प्रज्ञा प्रबोधिनी (पारधी समाजकार्य काम) * शिवाजी शिक्षण संस्था * हनुमान व्या. प्र. मंडळ * विद्यार्थी परिषद नेतृत्वाशी चर्चा * हेडगेवार रुग्णालय इत्यादी

**दिवस – १२ नागपूर समापन**
* गुरुकुंज मोझरी, वरुड * श्री वसंत फुटाणे यांची नैसर्गिक शेती * देवलापार गो अनुसंधान प्रकल्प समारोह * **नागपूर यात्रा समाप्ती**

सविस्तर माहिती नंतर देण्यात येईल. मोठे उद्योजक शेतकरी/ संशोधक संबंधितांची उपलब्धता पाहून अंतिम कार्यक्रम तयार होईल.

## ❒ निवड प्रक्रिया

प्रथम गुगल फॉर्म भरणे. सोबत आपल्या कामाचा लेख/फोटो/व्हिडिओ सबमिट करणे त्यातून निवडलेला व्हिडिओ किंवा प्रत्यक्ष मुलाखत या आधारे अंतिम निवड. त्यांची समूह चर्चा आयोजन. त्यातून पुन्हा अंतिम निवड



आपल्या सामाजिक जाणीवा सक्षम, सतर्क तसेच विस्तृत करण्याच्या दृष्टीने ही यात्रा आहे. यात सहभागी होण्यासाठी अनेक चाचण्या असतील त्यातीलच एक आपल्याला या कार्याची आवड आणि यासाठी आपण आजपर्यंत केलेले प्रयत्न, हे असेल.

## ❒ अनुभूती यात्रा वेळापत्रक




| | |
|---|---|
| **फार्म व माहिती जाहीर करणे** | **– ५ सप्टेंबर २०२२** |
| **अर्ज भरण्याची प्रारंभ दिवस** | **– १० सप्टेंबर २०२२** |
| **सहभागासाठी अर्ज भरण्याची मुदत** | **– २५ सप्टेंबर २०२२** |
| **अर्ज छाननी व ऑनलाईन समूह चर्चा आयोजन** | **– २६–३० सप्टेंबर २०२२** |
| **नागपूर विद्यापीठ केंद्रावर प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन मुलाखत** | **– १ ते ५ ऑक्टोबर २०२२** |
| **सहभागाची अंतिम निवड घेऊन त्यांना निवड पत्रे पाठविणे** | **– ६ ते ११ ऑक्टोबर २०२२** |
| **अनुभूती यात्रा शुल्क बँकेत जमा करण्याची मुदत** | **– १२ ते १५ ऑक्टोबर २०२२** |
| **अनुभूती यात्रेसाठी नागपूरला एकत्र येणे** | **– २९ ऑक्टोबर २०२२** |
| **प्रत्यक्ष अनुभूती यात्रा** | **– ३० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२२** |

## ❒ अनुभूती यात्रेचा प्रभाव

युवकांच्या वर्तवणुकीतील आणि विचारांच्या पातळीवरील बदल घडवून आणणे हे एक आव्हानात्मक काम आहे. जागृती यात्रेचा प्रभाव मोठा आणि खोल असतो. यात्रेनंतर दृष्टी, विचार आणि आचरणात मोठा बदल होतो. विदर्भातील प्रकल्प नेतृत्वाला भेटी देत जाणारी ही जागृती यात्रा ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास आहे.

## ❒ प्रमाणपत्र




**ग्रामायण तर्फे अनुभूती यात्रा सहभाग पत्र देण्यात येईल तसेच विद्यापीठातर्फे त्यांच्या विद्यार्थ्यांना अभिनंदन पत्र देण्यात येईल.**

**धन्यवाद.**

**स्नेहांकित**


**अनिल सांबरे**
अध्यक्ष
९२२५२१०१३०

**संजय सराफ**
सचिव
९८२२२२००९२

**सौ. मंजुषा रागीट**
मुख्य समन्वयक अनुभूती यात्रा
९९७०३४३५७५

# ग्रामायण प्रतिष्ठान, नागपूर

नागरिकांना समाज परिवर्तनाशी जोडणारे व्यासपीठ!

२४ योगक्षेम ले-आऊट, स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर- ४४० ०१५ (महाराष्ट्र)

Email : gramayanpratishtan@gmail.com www.gramayan.org gramayanpratishthan YouTube gramayansewagatha gramayan

मो. नं : 8767790420,9225210130,9822345715,9970343575, 9421701582,98222064261,9822642118




**Google Form LINK**

# अनुभूती

## ग्रामायण समाजभान जागृती यात्रा!

## उद्याच्या परिवर्तनक्षम युवा नेतृत्वासाठी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली *students for development, ABVP यांच्या संयुक्त सहकार्याने



ग्रामायण संस्थेची ही अनुभुती समाजभान जागृती यात्रा म्हणजे असे वेगळे जग बघण्याची, कर्तृत्ववान, हटके काम करणाऱ्या माणसांना समजून घेण्याची संधी आहे. जीवनाला दिशा आणि ध्येय देणाऱ्या या यात्रेत सहभागी व्हा. रोजच जे जगतो, त्यापेक्षा हटके जगून बघा. स्वतःला एक्स्प्लोअर करा.

* स्वतःला स्वतःची ओळख पटविण्यासाठी * वेगळी दुनिया एक्स्प्लोअर करण्यासाठी * हटके माणसांना समजून घेण्यासाठी
आपआपल्या क्षेत्रात परिवर्तन घडविण्यात यशस्वी ठरलेल्या विदर्भातील सेवाभावी, सामाजिक, औद्योगिक, कृषी व संशोधक नेतृत्वाला प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची अभूतपूर्व संधी!





### निवड निकष

* संपूर्ण विदर्भातील निवडक प्रतिभाशाली नेतृत्वगुण असणारे व सामाजिक विचार करणारे 45 युवक युवतींना संपूर्ण निवड प्रक्रिये नंतर प्रवेश संधी
* कोणती विद्याशाखा/कोणतेही कॉलज
* विदर्भात राहणारे किंवा शिकणारे युवक/युवती
* वयोगट 20 ते 30 वर्षे
* सहभागी युवक संख्या - 45

- यात्रेचा कालावधी व शुल्क
- ही 12 दिवसांची बस यात्रा आहे.
- साधारणतः 2000 कि.मी. अंतर
- 30 ऑक्टोबर ते 10 नोव्हेंबर 20 22
- सहयोग शुल्क- 7500/- रू. प्रत्येकी





### निवड प्रक्रिया

प्रथम गुगल फॉर्म भरणे. सोबत आपल्या कामाचा लेख/फोटो/व्हिडिओ सबमिट करणे त्यातून निवडलेला व्हिडिओ किंवा प्रत्यक्ष मुलाखत या आधारे अंतिम निवड. त्यांची समूह चर्चा आयोजन त्यातून पुन्हा निवड
आपल्या सामाजिक जाणीवा सक्षम, सतर्क तसेच विस्तृत करण्याच्या दृष्टीने ही यात्रा आहे. यात सहभागी होण्यासाठी अनेक चाचण्या असतील त्यातीलच एक आपल्याला या कार्याची आवड आणि यासाठी आपण आजपर्यंत केलेले प्रयत्न.

### आजच नोंदणी करा

ग्रामायण प्रतिष्ठान, नागपूर
ई-मेल- gramayanpratishthan@gmail.com
फोन नं. -9225210130 /9970343575

ग्रामायण प्रतिष्ठान नागपूर

**Google Form LINK**




**Google Form LINK**